# ससूनमध्ये ५९ खाटांच्या नवजात आयसीयूची सुविधा

**पुणे** : कॉर्पोरेट कंपन्या व स्वयंसेवी संस्थांनी मिळून ससून रुग्णालयास करोडो रुपयांची देणगी देऊन नवजात शिशुंसाठी जो सुसज्ज अतिदक्षता विभाग उभारला आहे, त्याचा राज्यातील इतर वैद्यकीय महाविद्यालयांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी ससून रुग्णालयात व्यक्त केले. फिनोलेक्स इंडस्ट्रिज, मुकुल माधव फाउंडेशन आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ससून रुग्णालयात नवजात बालकांसाठी उभारलेल्या ५९ खाटांच्या अतिदक्षता विभागाचे महाजन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.



ससून रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभागाच्या उद्घाटनप्रसंगी वैद्यकिय शिक्षण मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गिरीश बापट, महापौर सौ. मुक्ता टिळक, खासदार अनिल शिरोळे, मुकुल माधव फाउंडेशनच्या रितू छाब्रिया, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे आदी उपस्थित होते.

यावेळी पुण्याच्या महापौर सौ. मुक्ता शैलेश टिळक, खासदार अनिल शिरोळे, सामाजिक न्यायमंत्री दिलीप कांबळे, पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, फिनोलेक्स इंडस्ट्रिज लिमिटेडचे प्रकाश छाब्रिया, फिनोलेक्सचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, श्रीमंत दगडूशेठ हलवाईचे गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले आदी मान्यवर उपस्थित होते.

ससूमधील नवजात शिशुंसाठी असणारा हा आयसीयू म्हणजे पथदर्शी प्रकल्प असून, त्याचा अवलंब राज्यातील इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी करावा. यावेळी महाजन यांनी आयसीयू उभारणी करण्यासाठी देणगीदारांचे कौतुकही केले. पालकमंत्री गिरीश बापट यांनी रुग्णांना केंद्रबिंदू मानून उपचार करणारे ससून रुग्णालय असल्याचे मत व्यक्त केले.

रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर ५९ खाटांचा नवजात शिशु अतिदक्षता विभाग (नीओनेटल आयसीयू) उभारण्यात आलेला आहे. यापैकी कृत्रिम श्वासोच्छ्वासासाठी १८, ऑक्सिजनची गरज असलेल्यांसाठी १५, अशक्त शिशुंसाठी २२, संसर्ग असलेल्यासांठी स्वतंत्र २, तर अपघात विभागासाठी २ असे बेड तयार करण्यात आलेले आहेत. इतकेच नव्हे तर नवजात शिशुंच्या मातेलाही येथे स्नान, जेवण व राहण्याची सोय आहे. एखाद्या मातेला दूध येत नसल्यास तिच्या बाळाला दूध पाजण्यासाठी मानवी दुग्धपेढी (ह्यूमन मिल्क बँक), यूएसजी व २ डी इको तपासणी, शिशुला बहिरेपणा आहे का याचीही तपासणीही येथे होणार आहे. विशेष म्हणजे ही उच्च दर्जाची सेवा रुग्णांसाठी पूर्णपणे मोफत आहे.

अनेक गर्भवती महिलांचे अनेक कारणांनी पूर्ण महिने भरण्याआगोदरच प्रसूती (डिलिव्हरी) होते. ही बालके कमी वजनाची असू शकतात. काही बालकांना जन्मताच कावीळ किंवा इतर गंभीर स्वरूपाचा आजार होतो. त्या बालकांना नीओनेटल आयसीयूची गरज पडते. ससून रुग्णालयात दर वर्षाला सुमारे ८ ते ९ हजार महिलांच्या प्रसूती होतात. त्यापैकी १५ टक्के बालकांना तरी या आयसीयूची गरज पडते. त्यांना याचा खूप फायदा होणार आहे.

**आयसीयूसाठी दहा कोटींचा खर्च**

आयसीयू उभारण्यासाठी कार्पोरेट कंपन्यांनी १० कोटी रुपयांचा निधी समाज उत्तरदायित्व निधी (सीएसआर) द्वारे उभारला आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रिज व संलग्न मुकुल माधव फाउंडेशनकडून ४.२ कोटी, श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टकडून ३ कोटी, कमिन्स इंडियाकडून जनरेटर सेट, सुझलॉन एनर्जी व सिस्का एलईडीकडून मेडिकल गॅस पाईपलाईन, बँक ऑफ बडोदाकडून दुग्धपेढी, तर राज्य शासनाकडून २ कोटी असे एकूण १० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे.